**नियमित दिवाणी दावा क्र. १६८/२०२२ मधील नि. १४ वरील आदेश.**
**CNR No.MHAH23-000536-2022**

१. अर्ज व म्हणणे पाहिले.

२. प्रतिवादी क्रमांक १ व ३ यांनी अर्जात कथन केले आहे की, सदर दाव्यामध्ये प्रतिवादी यांना समन्स नोटीस मिळाल्यानंतर मुदतीत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी नं. १ ह्या महिला आहेत. तसेच प्रतिवादी नं. १ व २ हे आजारी असल्याकारणाने व कैफियत देणेकामी आवश्यक असणारी कागदपत्रे मुदतीत उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे प्रतिवादींना मुदतीत कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. त्यामुळे सदर प्रतिवादी विरूध्द विना कैफियतचा आदेश झालेला आहे. परंतु वर नमुद केलेल्या कारणामुळे प्रतिवादी यांना कोर्टात हजर राहता आले नाही, कैफियत देता आली नाही. सदर प्रतिवादी यांनी जाणुन बजुन उशीर केलेला नाही. सदर प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर न आल्यास त्यांचे अपरिमीत असे नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादी यांची कैफियत स्विकारण्याबाबत प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. वादी यांनी याच अर्जा पाठीमागे म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. वादीचे कथनानुसार, सदर प्रतिवादी क्रमांक १ व ३ यांचा अर्ज खरा व बरोबर नसून सदर अर्जातील कारणे चुकीची आहेत, सदर अर्ज प्रतिवादी यांनी जाणीवपुर्वक उशीर करण्यासाठी दिला असून त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व प्रतिवादींचा अर्ज मंजुर करण्याचे झाल्यास प्रतिवादींना रक्कम रुपये ५,०००/– कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**४.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्रमांक १ व ३ यांना दिनांक २५/०७/२०२२ रोजी समन्सची बजावणी होवून ते दिनांक २५/०७/२०२२ रोजी प्रकरणात हजर झाले. त्यांना समन्स बजावणी झालेपासुन कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी विहित मुदतीत कैफीयत दिलेली नाही. प्रस्तुत अर्ज दिनांक २०/०१/२०२४ रोजी दिला आहे. यावरुन कैफीयत दाखल करण्यास साधारणपणे तीन महिन्यांचा विलंब झाला आहे. प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीची मोजणी करुन व हद्दीच्या खुना कायम करुन तसचे निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला असल्यामुळे तसेच प्रतिवादी क्रमांक १ व ३ हे त्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील आहेत. अशा परिस्थितीत, त्यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे झालेल्या विलंबाबाबत वादींना खर्चाची रक्कम देण्याचे अटीवर प्रतिवादी क्रमांक १ व ३ यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज (निशाणी क्रमांक १४) प्रतिवादी क्रमांक १ व ३ यांनी वादीस खर्चाची रक्कम रुपये ३००/- देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2024.02.27 16:24:54 +0530

श्रीगोंदा.
दिनांक २७/०२/२०२४.

**( ए. एन. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.